# मेट्रो डब्यांच्या प्रतिकृतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

लोकमत न्यूज नेटवर्क :

**मुंबई :** मेट्रो-३ मार्गिकेवर धावणाऱ्या मेट्रोच्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) मेट्रो-३ चे डबे बनविण्याचे काम 'अॅलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड' या कंपनीला दिले आहे. मेट्रो-३ या संपूर्णतः भूमिगत मेट्रो मार्गिकेला 'अॅक्वा लाइन' असे संबोधले जाणार आहे. या डब्यांची रंगसंगती तसेच डब्यांची आंतर-बाह्य संरचना नावाला साजेशी करण्यात येणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो - ३ मार्गिकेसाठी आठ डब्यांच्या एकूण ३१ गाड्या अॅलस्टॉम या कंत्राटदाराद्वारे बनविण्यात येतील. केंद्र शासनाच्या 'मेक इन इंडिया' या संकल्पनेप्रमाणे मेट्रो-३ मार्गिकेच्या सर्व गाड्यांची निर्मिती अॅलस्टॉम इंडिया यांच्या श्री सिटी, आंध्र प्रदेश येथील कारखान्यात होणार आहे. मेट्रो-३ चे डबे अद्ययावत असतील तसेच विनाचालक कार्यान्वयनासाठी सक्षम असतील, असे एमएमआरसीने सांगितले. मेट्रो-३ द्वारे प्रवाशांना आरामदायी, सुखकर, वेगवान प्रवास करणे शक्य होईल; तसेच कार्यान्वित झाल्यावर मेट्रो-३ मुंबईची नवीन जीवनवहिनी ठरेल, असा विश्वास एमएमआरसीने व्यक्त केला आहे.

याविषयी प्रतिक्रिया देताना एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मेट्रो-३ मार्गिकेच्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण होणे हा आमच्यासाठी आनंदाचा प्रसंग आहे. मेट्रो-३ मार्गिकेच्या डब्यांच्या निर्मितीला नोव्हेंबर २०१९ पासून सुरुवात होईल. पहिली गाडी एका वर्षाच्या आत मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे, असे त्यांनी सांगितले.



मेट्रो डब्यांच्या प्रतिकृतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण झाले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांसह अन्य मान्यवर हजर होते.

## मेट्रो डब्यांची खास वैशिष्ट्ये -

- सुरक्षित आरामदायी प्रवासासाठी संपूर्णतः वातानुकूलित व आर्द्रता नियंत्रण यंत्रणा.
- प्रवाशांच्या मनोरंजनासाठी व जाहिरातीसाठी एलसीडीचा वापर.
- मार्गिकेचा डिजिटल नकाशा.
- प्रवाशांसाठी उद्घोषकांचा वापर.
- अतिशय सुंदर बैठक व्यवस्थेसह उभे राहून प्रवास करणाऱ्यांसाठी खांबांची व्यवस्था.
- दिव्यांग प्रवाशांच्या सोईसाठी व्हीलचेअर ठेवण्यास स्वतंत्र व्यवस्था.
- सुखकर प्रवासाच्या अनुभूतीसाठी अद्ययावत एअर सस्पेन्शनचा वापर.
- प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक डब्यात सीसीटीव्हीची सुविधा.
- आगीपासून संरक्षणासाठी प्रत्येक डब्यात अग्निशमन, धूर व अग्निशोधक यंत्रणा.
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व ट्रेन नियंत्रक यांच्यात संवाद साधण्यासाठी ध्वनी संवाद (व्हॉईस कम्युनिकेशन) यंत्रणा.



## अशी असेल रंगसंगती

सतत जागते राहणारे आणि गतिमान शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईची प्रेरणा घेऊन मेट्रो-३ चे डबे डिझाईन करण्यात आले आहेत. मुंबईचा समुद्र आणि वाहत्या पाण्याचा ताजेपणा आणि वेगवान प्रवाह यापासून प्रेरणा घेऊन या डब्यांची रंगसंगती ठरविण्यात आली आहे. यामध्ये फिका हिरवा (अॅक्वा ग्रीन) आणि फिका पिवळा (बेज) या रंगांचा वापर करण्यात आला असून त्यापैकी हिरवा रंग समुद्राच्या लाटांचा प्रवाहीपणा, ताजेपणा आणि वेग तसेच पिवळा रंग हा आरामदायी प्रवासाचे प्रतीक आहे, असे एमएमआरसीने स्पष्ट केले.